मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका क्षेत्रातील अनधिकृत फ्लेक्स, होर्डिंग तातडीने हटवा

## अन्यथा संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल : आयुक्त शेखर सिंह यांचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील अनधिकृत फ्लेक्स, जाहिराती, घोषणा फलक, पोस्टर्स, किऑक्स, गॅन्ट्री आदी साहित्य तातडीने हटवावे, अन्यथा संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे.



पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील अनधिकृत फ्लेक्स, जाहिराती- घोषणा फलक, पोस्टर्स, किऑक्स, गॅन्ट्री आदी विरुद्ध योग्य कार्यवाही करण्याबाबत पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यातील मालमत्तेच्या विद्रुपीकरणास प्रतिबंध करण्यासाठी अधिनियम १९९५ चे कलम ३ तसेच महाराष्ट्र अधिनियमातील कलम २४४ (१) (२) (३), २४५(१) (२) आणि महानगरपालिका आकाशचिन्ह तसेच जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण करणारे नियम दिनांक ९ मे २०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार तरतुदी निर्गमित करण्यात आल्या असून या नियमांचे उल्लंघन करून अनधिकृत फ्लेक्स, जाहिराती- घोषणा फलक, पोस्टर्स, किऑक्स गॅन्ट्री आदी उभारण्यात आले असल्यास संबधितांवर कारवाई करण्यात येणार आहे.

या बैठकीस उपस्थित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आयुक्त शेखर सिंह यांनी विविध सूचना दिल्या, पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील अनधिकृत फ्लेक्स, जाहिराती- घोषणा फलक, पोस्टर्स, किऑक्स गॅन्ट्री आदी विरुद्ध संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी योग्य कार्यवाही करावी. तसेच पर्यवेक्षणासाठी आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपआयुक्त यांनी नोडल अधिकारी म्हणून काम पाहावे, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रत्येक प्रभागात अनधिकृत फ्लेक्स, जाहिराती- घोषणा फलक, पोस्टर्स, किऑक्स गॅन्ट्री आदी अनधिकृत बाबींना प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांची एक समिती संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी गठीत करावी, तसेच याबाबत व्यापक जनजागृती करावी, अनधिकृत रित्त्या उभारण्यात येणाऱ्या जाहिरात फलकावर प्लास्टिक किंवा इतर अविघटनशील पदार्थांचा वापर केला असल्यास संबधितांवर क्षेत्रीय अधिकारी यांनी योग्य कार्यवाही करावी, महापालिकेद्वारे संबंधित कार्यक्षेत्रामध्ये नविन जाहिरात फलक उभारणे तसेच पुर्वी दिलेल्या जाहिरात फलकाचे नुतनीकरण केले जाते.

याबाबतचे प्रस्ताव संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे दाखल केले जातील त्यावर संबंधित परवाना निरीक्षक स्थळपाहणी करून क्षेत्रीय अधिकारी स्थळ पाहणी अहवाल सादर करतील त्यानुसार प्रस्तावाची तपासणी करून क्षेत्रीय अधिकारी यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव आकाशचिन्ह व परवाना विभागप्रमुखांकडे मंजुरीसाठी सादर करावे असे आयुक्त सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले.

### आयुक्तांच्या अधिकाऱ्यांना सूचना

» अनधिकृतपणे उभारण्यात येणाऱ्या कमानी, मंडप, झेंडे, फलक याबरोबरच खाजगी तथा मार्वजनिक जागेवर लावण्यात आलेले अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, फ्लेक्स, पोस्टर, किऑक्स, गॅन्ट्री आदीवावत मंबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी उचित कार्यवाही करावी, अशा सर्व कार्यवाहीचे फोटोग्राफी, चित्रीकरण व पंचनामे करून ते संग्रही ठेवावे, आदी सूचना आयुक्त सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# पालिका कर्मचाऱ्याच्या मुलाची लेफ्टनंटपदाला गवसणी

## आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते लेफ्टनंट शिवराज मोरे यांचा सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचा-यांचे मुले-मुली शिक्षण, कला, संशोधन, क्रीडा यासारख्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून आपले स्थान निर्माण करीत आहेत, त्यांच्यामुळे शहराच्या नावलौकीकातही भर पडत असून त्यांचा गौरव करताना अभिमान वाटत असल्याचे मत आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केले.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील आरेखक संजीवनी प्रदीप मोरे यांचा मुलगा शिवदीप यांची वयाच्या 22 व्या वर्षी सैन्यदलात लेफ्टनंट या पदावर नेमणूक झाली. सैन्यदलात रूजू होण्यापूर्वी शिवदीप यांनी आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेतली असता त्याच्या सत्कार प्रसंगी आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,आरेखक संजीवनी मोरे, लघुलेखक पळसकर, उपलेखापाल गीता धंगेकर, विजया कांबळे आदी उपस्थित होते.



मोरे कुटुंबियांचे नवी सांगवी येथे वास्तव्य असून, बारावीनंतर टेक्निकल इन्ट्री स्कीमद्वारे होणारी परिक्षा बंगलोर येथून दिली असून त्यामध्ये, ते पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी पुढील प्रशिक्षण बिहार राज्यातील गया येथे ऑफीसर्स ट्रेनिंग अकॅडमी येथून घेतले आहे.

त्याठिकाणी बेसिक मिलीटरी ट्रेनिंग फेज वन वर्ष पूर्ण केले असून ते फेज टू करिता कॅडेटस ट्रेनिंग विंग करीता सिकंदराबाद येथील मिलीटरी कॉलेज ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड मेकॅनिकल इंजिनियरिंग या संस्थेत दाखल झाले असून त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंग मधून बी. टेक पदवी घेतली आहे. शिवराज यांना प्रशिक्षणादरम्यान सुवर्णपदकांसह विविध पुरस्कार मिळालेले असून त्यांना सैन्यप्रमुख उपस्थितीत लेफ्टनंट पदवी मिळालेली आहे.

# पुणे-लोणावळा लोहमार्गाला 24 वर्षांपूर्वी मंजुरी!

## नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणाची व्यवस्था अन् रुग्ण सर्वेक्षण

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-लोणावळ्यादरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या लोहमार्गाचे काम गेल्या कित्येक वर्षांपासून लालफितीत अडकले आहे. त्यामुळे या लोहमार्गावरील तिसरा व चौथा ट्रॅक मंजुरीनंतरही कागदावरच राहिला आहे. आता या लोहमार्गाच्या कामाला केंद्र आणि राज्य सरकार यांच्यामध्ये कोण किती खर्च करायचे हे अजून ठरलेले नाही. त्यामुळे लोहमार्गाचे काम कधी सुरू होणार हे अद्याप ठरले नाही, अशी माहिती मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांनी सांगितले.



मुंबईवरून दक्षिण भारतात जाण्यासाठी पुणे-लोणावळा लोहमार्ग हे महत्त्वाचे आहे. पुणे-मुंबईदरम्यान वाहतूक सुरळीत करण्यासाठी १६०० कोटींचा द्रुतगती मार्ग उभारला गेला. तर दुसरीकडे गेल्या पाच वर्षांत मेट्रोसाठी २५ हजार कोटी खर्च होत आहेत. मात्र, या प्रकल्पांच्या तुलनेत कमी खर्च असलेला पुणे-लोणावळारेल्वेच्या तिसऱ्या आणि चौथ्या लाइनचा प्रकल्प गेल्या कित्येक वर्षांपासून रखडला आहे. गेल्या २४ वर्षांपूर्वी १९९७-९८ मध्ये पुणे-लोणावळा लोहमार्गाला पहिल्यांदा मंजुरी मिळाली होती. यानंतर २०१४-१५ मध्ये विकास आराखडा तयार करण्यात आला. दरम्यान, रेल्वे बोर्डाने २०१६ मध्ये तिसऱ्या आणि चौथ्या लाइनसाठी ९४३.६० कोटींच्या खर्चाचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला. २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मार्गासाठी राज्य सरकारकडून बजेट मंजूर केल्याचे सांगितले होते. मात्र, त्यानंतर राज्य शासनाकडूनही याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे पुणे-लोणावळा या ६३.८४ किलोमीटर लोहमार्गाच्या तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकला १९९७-९८ मध्ये मंजुरी मिळाली. मात्र, प्रत्यक्षात अद्यापही काम सुरू झालेले नाही.

### महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठीच तरतूद

» राज्य आणि केंद्र शासनाकडून त्यांच्या राजकीयदृष्ट्या सोयीचे आणि लाभदायी ठरणाऱ्या प्रकल्पांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप केला जात आहे. त्यात मेट्रो प्रकल्प हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून मोठी तरतूद केली जात आहे. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून पुणे-लोणावळा लोहमार्गाच्या चौपदरीकरणाची मागणी होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. याचा परिणाम रेल्वे वाहतूक आणि उत्पन्नावर होत आहे.

पुणे-लोणावळा या दुहेरी लोहमार्गावर रेल्वेची मोठी वाहतूक आहे. दिवसभर या मार्गावरून किमान ३०० गाड्यांची वाहतूक होते. त्यामुळे कोणताही अपघात होऊ नये, यासाठी नियमित देखभाल दुरुस्ती करावी लागते. परिणामी, दुपारच्या दरम्यान ब्लॉक घ्यावा लागतो. त्यामुळे अनेक गाड्या विलंबाने धावतात. अनेकदा लोकलच्या काही फेऱ्या रद्द कराव्या लागतात. तसेच माल वाहतूक करणाऱ्या रेल्वे गाड्यांना थांबावे लागते.

> पुणे-लोणावळा या लोहमार्गाचा डीपीआर बोर्डाकडे पाठविण्यात आला आहे. परंतु या मार्गाला होणारा खर्च केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात किती टक्के करायचे, हे अद्याप ठरलेले नाही. त्यामुळे या मार्गाच्या कामाला वेळ लागणार आहे.
>
> **- धर्मवीर मीना, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे.**

# मालमत्ता कर थकबाकीदार महापालिकेच्या रडारवर!

## शहरात 1 लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या व्यावसायिक मालमत्तांवर जप्तीची कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्यांमध्ये खासगी संस्था, महाविद्यालये व शाळा, हॉटेल, खासगी रुग्णालये, पेट्रोल पंप, औद्योगिक कारखाने, शोरुम, मंगल कार्यालय, बँक, मॉल, चित्रपटगृहे आता पिंपरी महापालिकेच्या रडारवर आहेत. अशा थकबाकी असणाऱ्या आस्थापनांची यादी करसंकलन विभागाकडून तयार करण्यात आली असून अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता तात्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयातील प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.




पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून एक लाखाहून जास्त थकबाकी असणाऱ्या सर्व थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्तांवर जप्ती कारवाईची धडक मोहिम सुरु करण्यात आली आहे. एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता तात्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयातील प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

त्यानुसार, करसंकलन विभागाने ७ जानेवारीपर्यंत तब्बल ४१८ मालमत्ता जप्त केल्या असून, त्यांच्याकडे तब्बल ११ कोटी ३७ लाख २३ हजार १९८ रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे. मालमत्ता जप्ती कारवाईवेळी १५११ मालमत्तांनी आपल्या थकीत कराचा भरणा करुन, २६ कोटी ९२ लाख ७३ हजार ७४९ इतक्या कराचा भरणा केलेला आहे. थकबाकीदारांना वारंवार आवाहन करुन देखील कराचा भरणा केला नसेल अशा मालमत्तांवर जप्तीच्या कारवाईसाठी कठोर पाऊले उचलावीत असेही आदेश करसंकलन मुख्य कार्यालयाकडून विभागीय कार्यालयास देण्यात आले आहेत.

> शहरातील थकबाकीदारांना वारंवार कर भरण्याचे आवाहन करण्यात आले असून एक लाखाहून जास्त रक्कम थकीत असणाऱ्या मालमत्तांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. शहरातील बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्ता प्राधान्याने जप्त करण्यात येत असून मालमत्ताधारकांनी आपल्या थकीत कराचा तात्काळ भरणा करुन जप्तीची कारवाई टाळावी.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त.**

शहरातील एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्यांमध्ये खासगी संस्था, खासगी महाविद्यालये व शाळा, हॉटेल, खासगी रुग्णालये, पेट्रोल पंप, औद्योगिक कारखाने, शोरुम, मंगल कार्यालय, बँक, मॉल, चित्रपटगृहे आदी आस्थापनांचा समावेश आहे. या थकबाकी असणाऱ्या आस्थापनांची यादी करसंकलन विभागाकडून तयार करण्यात आली असून, संबंधित विभागीय कार्यालयास कारवाईसाठी पाठविण्यात आली आहे. याचबरोबर अशा मालमत्तांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिध्द केली जाणार आहे. त्याचबरोबर अशा थकबाकीदारांना आवाहन करण्यासाठी सदर आस्थापनांच्या बाहेर बँड पथकाकडून बँड वाजविण्यात येणार आहे. या मालमत्तांवर चालू स्थितीमध्ये सुध्दा जप्ती करण्याचे आदेश करसंकलन विभागाकडून देण्यात आले असून शहरामध्ये मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.

# एचएमपीव्ही व्हायरसला घाबरून नका; काळजी घ्या!

## पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्यावतीने आवाहन : वैद्यकीय यंत्रणा सतर्क

**पिंपरी | प्रतिनिधी**

ह्युमन मेटान्यूमोव्हायरस अर्थात एचएमपीव्ही विषाणूचा भारतात शिरकाव झाल्यानंतर पिंपरी- चिंचवड महापालिकेनेही आपली वैद्यकीय यंत्रणा सतर्क केली आहे. महापालिकेच्या आठही रुग्णालयांमध्ये सज्जता करण्यात आली असून शहरातील सर्दी, खोकला व तापाच्या रुग्णसंख्येवर (इंटिग्रेटेड डिसीज सर्विलन्स प्रोग्रॅम) आयडीएसपी सेलद्वारे महापालिका लक्ष ठेऊन आहे. नागरिकांनी घाबरून न जाता आपली काळजी घ्यावी आणि श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

महापालिकेचे आवाहन...

एचएमपीव्ही विषाणूच्या अहवालाबाबत चिंतेचे कारण नाही. याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून नाहक भितीचे वातावरण निर्माण करू नये. तसेच सर्दी, खोकला, ताप लक्षणे आढळल्यास नजीकच्या महापालिका दवाखाना किंवा रुग्णालयाशी संपर्क साधावा. खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी प्रशासनाने दिलेल्या नियमावलीचे पालन करावे, असे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्यावतीने नागरिकांना करण्यात येत आहे.




### कसा आहे एचएमपीव्ही विषाणू ?

- ह्युमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) हा एक सामान्य श्वसन विषाणू
- श्वसनमार्गावरील भागातील संसर्गास कारणीभूत ठरतो.
- हा एक हंगामी आजार आहे
- सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणे हिवाळा, उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो

### महापालिका यंत्रणा सज्ज

- महापालिकेच्या आठही रुग्णालयांमध्ये सज्जता
- रुग्णालयांमध्ये अधिकच्या खाटांची तरतूद
- गरज पडल्यास महापालिकेचे एक रुग्णालय एचएमपीव्हीसाठी राखीव ठेवणार
- सर्दी, खोकला व तापाच्या रुग्णांची आयडीएसपी सेलद्वारे नोंद

**हे करा...**

- खोकला किंवा शिंका येत असतील, तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका
- साबणाने किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने हात वारंवार धुवा
- ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा
- भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा
- संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्या
- दररोज स्वच्छ धुतलेला रुमाल वापरा

**हे करू नका...**

- हस्तांदोलन करणे टाळा
- टिश्यू पेपरचा पुनर्वापर करू नका
- आजारी लोकांच्या संपर्कात येणे टाळा
- डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करू नका
- सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका
- डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेऊ नका

# महापालिका अधिकाऱ्यांचे दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीचे प्रथम प्रशिक्षण संपन्न

## दस्तऐवज हाताळण्याच्या प्रक्रियेतील गती, अचूकता, पारदर्शकता आणि सुरक्षा देखील वाढणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीच्या अंमलबजावणीनंतर कागदविरहत कार्यालयीन कामकाजाला प्रोत्साहन मिळणार असून प्रशासकीय कामकाज सुलभ होण्यास आणि विभागांमध्ये योग्य समन्वय साधून कामकाजात अधिक सुसूत्रता सुनिश्चित होण्यास मदत होणार आहे. तसेच यामुळे दस्तऐवज हाताळण्याच्या प्रक्रियेतील गती, अचूकता, पारदर्शकता आणि सुरक्षा देखील वाढणार आहे, असे मत मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रशासनाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी आणि ई-ऑफिस या संकल्पनेला चालना देण्यासाठी प्रशासनामध्ये कागदविरहीत कामकाजाचा समावेश करण्याचे ध्येय ठेवले आहे. या अनुषंगाने कामकाजामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्याच्या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत सर्व अधिकाऱ्यांना आज दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली (डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टीम – डीएमएस) चे प्रथम प्रशिक्षण देण्यात आले.




सांगवी येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर येथे पार पडलेल्या या प्रशिक्षणादरम्यान यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य अभियंता अभियंता प्रमोद ओंभासे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी अभयचंद्र दादेवार, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, संजय खाबडे, उप आयुक्त विठ्ठल जोशी, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त सिताराम बहुरे, पंकज पाटील, अजिंक्य येळे, उमेश ढाकणे, प्रशासन अधिकारी किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित, किशोर ननवरे, शितल वाकडे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, हरविंदरसिंह बन्सल, दिलीप धुमाळ, प्रेरणा सिनकर, संध्या वाघ, महेश बरीदे, विजय वाईकर, विजय भोजने, सुनिलदत्त नरोटे, सतिश वाघमारे, विजयसिंह भोसले, वैशाली ननवरे, विजय ओहोळ, अनिल भालसाखळे, बाळू लांडे, संतोष दुर्गे, विजय सोनवणे, राजेंद्र महाजन, मानिक चव्हाण तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण म्हणाले, आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचनेनुसार येत्या २६ जानेवारीपासून डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टीम प्रणालीचा कामकाजामध्ये समावेश करण्यात येणार असून यामागचा उद्देश डिजिटल कार्यपद्धतीकडे वाटचाल करून अधिकृत नोंदींचे डिजिटायझेशन आणि केंद्रीकरण करणे आणि अधिकाऱ्यांना आवश्यक ज्ञान आणि कौशल्य प्रदान करणे हा आहे.

डिजिटल कार्यालयीन कामकाजाकडे वाटचाल करत असताना, नागरीकांना अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि नागरीक केंद्रित सेवा मिळण्याची अपेक्षा आहे. हा उपक्रम आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिकेने उचललेले एक महत्वाकांक्षी पाऊल असून यामुळे नागरिकांना अधिक प्रतिसादक्षम व जबाबदार सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यास मदत मिळणार आहे, असेही निळकंठ पोमण म्हणाले.

# केमीकल मिश्रीत सांडपाणी थेट रस्त्यावरच

## स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याला मोठा धोका : पाण्याचे स्त्रोतही खराब

**पुणे | प्रतिनिधी**

मदरसन ऑटोमेटिव्ह टेकनोलॉजी ॲण्ड इंजिनियरींग प्रा.लि. बिरदवडी प्लॅट या कंपनीचे केमीकल मिश्रीत सांडपाणी मोकळ्या जागेत सोडत आहे. ही कंपनी चालू होऊन एक वर्ष झाले असून आजुबाजुतील गावातील लोकांना भाम / चाकण या ठिकाणी जाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर दुर्गंधीचा त्रास तसेच आरोग्याला धोका निर्माण होत आहे.

या कंपनीचे त्यांचे उघड्यावरती सांडपाणी सोडले असल्याने स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याला मोठा धोका निमार्ण झाला असून त्यापासुन कॅन्सर सारखे दुर्धर आजार व इतर श्वसनासंबधीचे होण्याची शक्यता आहे. तसेच बोअरवेल पाण्याचे स्रोत या केमिकल युक्त पाणी सोडल्याने खराब झाले आहेत.



### ...अन्यथा ग्रामस्थ मोठे आंदोलन करणार

» मदरसन ऑटोमेटिव्ह टेकनोलॉजी ॲण्ड इंजिनियरींग प्रा.लि. कंपनीने केमीकल मिश्रीत पाणी या गावचे गावठाणामध्ये व महादेव मंदिराचे आवारात सोडत असल्याने त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा ग्रामस्थ मिळून मोठे आंदोलन उभे करणार असल्याचे त्यांच्या वतीने सांगण्यात आले.

बिरदवडी (ता. खेड) येथील जमीन गट नं. 27, 28, 49 व 50 या मिळकतीमध्ये मदरसन ऑटोमेटिव्ह टेकनोलॉजी ॲण्ड इंजिनियरींग प्रा.लि. चा प्लॅट असून या कंपनीमध्ये उत्पादित करण्याऱ्या मालापासुन निर्माण होणारे केमीकल मिश्रीत सांडपाणी व इतर कचरा बिरदवडी गाव येथील महादेव मंदिराच्या आजुबाजुला व गावचे मालकीचे गायरानमध्ये खुले सोडलेले आहे, त्यापासुन मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी निर्माण होत आहे.

त्यामुळे आजुबाजुच्या गावातील मुळ रहीवाशांना तसेच आजुबाजुतील गावातील लोकांना भाम/चाकण या ठिकाणी जाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर दुर्गंधीचा त्रास होत आहे. या कंपनीचे त्यांचे उघड्यावरती केमिकल मिश्रित सांडपाणी सोडले असल्याने स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याला मोठा धोका निमार्ण झाला आहे.

### निर्बंधनाचे, नियमांचे पालन करीत नाही

» कंपनीमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे. या संबधित महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रन महामंडळ, खेड तहसील, पंचायत समिती गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत बिरदवडी यांच्याकडे ग्रामस्थांनी तक्रार दाखल केली आहे. कुठल्याही कायद्याची अथवा शासनाने घालून दिलेल्या निर्बंधाचे तसेच नियमांचे पालन करत नाही.

> आम्ही असे कोणत्याही प्रकारचे रसायन मिश्रित पाणी सोडत नसून आम्ही पाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी आम्ही आमच्या कंपनी आवारातील झाडांसाठी वापरतो आहे.
>
> – अमित तिवारी, एचआर, मदरसन कंपनी

---

# 'पुरंदर' विमानतळाचे लवकरच टेक ऑफ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सप्टेंबर पर्यंत भूसंपादन करण्याच्या आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील बहुचर्चित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचा अखेर मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सप्टेंबर पर्यंत भूसंपादन करण्याच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) आदेश दिले आहेत. त्याचबरोबर अन्य नियोजनाच्या प्रक्रियाही राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे विमानतळ प्रकल्प वेग घेणार हे आता निश्चित झाले आहे.



सह्याद्री आतिथीगृहात सोमवारी (दि. 6) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत राज्यातील विमानतळाच्या बांकाम प्रगतीबाबत आढावा घेण्यात आला. त्यावेळी पुरंदरमधील आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जागा संपादीत करण्याचे आदेश देण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ तसेच इतर अधिकारी उपस्थित होते. पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर, खानवडी, मुंजवडी, कुंभारवळण या सात गावांमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प होणार असून यासाठी एकूण 2832 हेक्टर जागेचे भूसंपादन करण्यात येणार आहे.

प्रकल्पाला केंद्र आणि राज्य सरकार, विमानतळ प्राधिकरण, संरक्षण मंत्रालय आदींसह सर्व प्रकारच्या परवानग्या मिळाल्या आहेत. प्रकल्पाचा नकाशा तयार करून पूर्ण प्लान तयार करण्यात आला आहे. सरकारच्या उच्चाधिकार समितीने एमआयडीसी अथवा खाजगी कंपनी स्थापन करण्यासाठी तत्वता मान्यताही त्याचवेळी दिली होती. मात्र, विमानतळ प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध असल्याने सत्ताबदल होताच महाविकास आघाडी सरकारने प्रकल्प हलविण्याचा निर्णय घेतला. माजी आमदार संजय जगताप यांनी प्रकल्पातील जागेत बदल करून याच परिसराच्या पूर्व भागातील रिसेपिसे, पांडेश्वर, राजुरी, नायगाव तसेच बारामती तालुक्यातील भोंडवेवाडी, चांदगुडेवडी, आंबी खुर्द, या भागात प्रकल्प करण्याचा निर्णय घेतला.

### शेतकऱ्यांना विश्वासात कधी घेणार?

» पुरंदरमधील बहुचर्चित विमानतळ प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रीन सिग्नल दिला असून यामुळे लवकरच भूसंपादन प्रक्रियेला वेग येणार आहे. वास्तविक पाहता याबाबत कित्येक वर्षे चर्चा आणि आराखडे बांधण्यात येत होते, राजकीय श्रेयवाद सुरू होता. शासन अनेक घोषणा परस्पर जाहीर करीत असल्याने अनेकवेळा नागरिकांचा संतापही पाहायला मिळाला आहे. आजपर्यंत संबंधित गावातील एकाही शेतकऱ्याला विश्वासात घेतले गेले नसून एकही शासकीय अधिकारी किंवा राजकीय नेता शेतकऱ्यांशी बोललेला नाही. संपूर्ण गावेच्या गावे विस्थापित होत असल्याने अनेकवेळा आंदोलने, मोर्चे काढण्यात आले आहेत. आता शासनाने थेट भूसंपादनाचे आदेश दिल्याने पुन्हा एकदा नागरिक अस्वस्थ झाले आहेत. त्यामुळे प्रकल्प करताना स्थानिक नागरिकांना कधी विश्वासात घेणार ? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.